श्रीगुरु केदारबाबा ससे पाटील (साळुंखे)
ते
वै. भागवतबुवा कराडकर
दिंडी परंपरा

श्री क्षेत्र पंढरपूर

* ह. भ. प. वै. भागवतबुवा कराडकर *

॥ श्री विठ्ठल रुक्मिणी प्रसन्न ॥

१) श्रीगुरु वै. केदारबाबा साळुंखे किवळ (कराडकर)
२) श्री शिष्य वै. तुकारामबुवा वठारकर (कराडकर)
३) श्री शिष्य वै. शेवतुबुवा पवार (कराडकर) शाळगाव
४) वंश वै. श्री लक्ष्मणबुवा पवार (कराडकर) शाळगाव
५) श्री वै. वासुदेव लक्ष्मण पवार (कराडकर) शाळगाव
६) श्री वै. निवृत्ती वासुदेव पवार (कराडकर) शाळगाव
७) श्री वै. भागवतबुवा निवृत्तीबुवा कराडकर (शाळगाव)
८) श्रीमती वै. सुंदराबाई भागवतबुवा कराडकर
९) श्रीमती जनाबाई कृष्णा कराडकर
१०) नातु दत्तक :- श्री ह. भ. प. अरुण महारज कराडकर
११) श्री पन्तु गणेश अरुण महाराज कराडकर

टीप :- वै. वासुदेव गुरु तुकारामबुवा पवार कराडकर यांच्यापासून श्रीक्षेत्र पंढरपुर येथे इ. स. १८८६ रोजी घ. नं. ९१९ खरेदी केल्यावर पंढरपुर येथे राहु लागले.

धन्य धन्य ज्यांस पंढरीचा वास।
धन्य ते जन्मास प्राणी आले ॥

अभिप्राय :- परमपुज्य श्रीगुरु रामानंदसरस्वती महाराज महादेवटेकडी यांच्या कृपा आशिर्वादाने श्री ह. भ. प. अरुण महाराज कराडकर हे वंश परंपरा लिहित आहेत त्याबद्दल अभिप्राय

अभिनंदन :- पुज्यश्री गुरु केदारबाबा कराडकर किवळ (साळुंखे) यांचे जीवन चरित्र व दिंडी परंपरा लिहिल्याबद्दल श्री समस्त वारकरी फडकरी दिंडी समाज (संघटना) आणि सर्व महाराज मंडळीतर्फे अभिनंदन.

श्री समस्त वारकरी फडकरी दिंडी समाज (संघटना)
अध्यक्ष
श्री ह.भ.प. माधव महाराज शिवणीकर

॥ श्री विठ्ठल रुक्मिणी प्रसन्न ॥

(श्री गुरु केदार बाबा कराड्कर साळुंखे) मुळ गाव मु.पो. किवळ ता. कऱ्हाड जि. सातारा या गावचे ते मुळ रहिवासी होते. त्यांचे वडिल पंढरपुरचे वारकरी होते. त्यांचे कुलदैवत श्री डोंगरावरील जोतीबा दख्खनचा राजा हे होते. त्यांना दोन मुले होती. एक मुलगा म्हणजे केदार बाबा हे थोरले होते. दुसरे बंधू म्हणजे श्री संत नावजीबुवा साळुंखे हे होते.

थोरला मुलगा म्हणुन श्री जोतिर्लींग या नावाचा उल्लेख होण्याकरिता श्री केदार हे नाव ठेवण्यात आले. केदार बाबा हे पंढरपुरची पायी वारी करत. ते श्री विठ्ठल भक्त होते.

श्री संत नावजीबुवा हे श्री जोतिर्लींगाची भक्ती करणारे भक्त होते. श्री संत नावजीबुवा यांची श्री जोतिबाविषयी अत्यंत भक्ती होती. नावजीबुवा हे दररोज किवळ ते जोतिबा पायी वारी करत. ते देवाचे लाडके भक्त होते. जशी श्री क्षेत्र पंढरपुर येथे श्री विठ्ठल मंदीराला श्री संत नामदेव पायरी आहे. तशी जोतिर्लींगाच्या मंदीरामध्ये श्री संत नावजीबुवा यांची पायरी आहे. श्री संत नावजीबुवा यांचे लग्न झाले होते. श्री गुरु केदार बाबा हे ब्रह्मचर्य व्रत धारण केलेले सत्पुरुष होते. श्री संत नावजीबुवा यांची समाधी मंदीर किवळ या गावी भव्य अशी आहे. श्रीगुरु केदारबाबा यांची समाधी श्री क्षेत्र नेवासे येथे ज्या ठिकाणी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांनी ''ज्ञानेश्वरी'' हा ग्रंथ श्री संत सच्छिदानंद बाबा यांना लिहिण्यास सांगितला व ज्या खांबाला श्री संत ज्ञानेश्वर महाराज टेकून बसत होते त्या मंदीराच्या उजव्या बाजूस श्री गुरु केदार बाबा यांची समाधी आहे. त्यांचा वैकुंठवास श्री क्षेत्र नेवासे या गावी झाला.

श्री संत नावजीबुवा यांचे व श्री गुरु केदार बाबा यांच्या जीवनातील काही लोकांनी चुकीची माहिती दिल्यामुळे मला श्री

संत नावजीबुवा यांच्या नावाचा उल्लेख करण्याची गरज वाटते. हे दोघे बंधु देवाचे निष्काम भक्ती करणारे भक्त होते. म्हणून दोघेही बंधुंना देवाने आपल्या जवळ स्थान दिले.

उभारिला ध्वज तिही लोकावरी।
ऐसी चराचरी कीर्ती ज्याची ॥१॥

या दोघा भावांच्या नावावर आजही श्री क्षेत्र जोतिर्लींग येथे श्री संत नावजीबुवा साळुंखे किवळ या गावचे ध्वजाचा ५ व्या क्रमांकाचे स्थान आहे. व श्री गुरु केदारबाबा यांचे वारकरी सांप्रदायमध्ये त्यांचे मानाचे स्थान आहे.

श्री गुरु केदारबाबा व त्यांची शिष्य परंपरा लिहिण्याचा योग मला आला. माझी फार दिवसांची इच्छा होती. कारण आमच्या घरण्यातील ते श्री केदारबाबा हे गुरु स्थानी आहेत. श्री गुरु केदारबाबा आणि आमचे पूर्वज शिष्य परंपरा लिहिण्याची घटना ही सत्य आहे.

सत्य संकल्पाचा दाता नारायण।
सर्व करी पुर्ण मनोरथ ॥

माझी पत्नी ही किवळ या गावची साळुंखे घराण्यातील आहे. वै. श्री ज्ञानदेव दौलती साळुंखे यांची ती नात आहे. सौ. नंदिनी अरुण कराडकर

कुळी कन्या पुत्र, होती जे सात्वीक
तयाचा हरीख, वाटे देवा ॥

श्री गुरु ते आमची पुर्वजनांची परंपरा

किवळ या गावापासून १० कि. मी. अंतरावर शाळगाव हे गाव आहे. शाळगाव हे माझ्या आजोबांचे, वै. ह. भ. प. भागवतबुवा निवृत्तीबुवा कराडकर (पवार) यांचे गाव शाळगाव या गावामध्ये आमच्या घराण्यास वारकरी सांप्रदायीक म्हणुन ओळखले जाते. आजही कराडकर हे कराड या भागातील असल्यामुळे कराडकर

हे आडनाव पडले आहे. श्री गुरु केदारबाबा यांची परंपरा व नित्यनियम आजही श्रीक्षेत्र पंढरपूर येथून चालवले जातात.

१) श्री गुरु केदारबाबा साळुंखे कराडकर (किवळ)

२) श्री संत भानुदास महाराज बेलापूरकर, पंढरपूर

३) श्री गुरु हैबतीबाबा अरपळकर (श्री क्षेत्र आळंदी)

हे तिघेही सत्पुरुष समकालीन होते. त्यांची माहिती पौष महिन्यातील श्रीक्षेत्र नाशिक, त्रिंबकेश्वर या वारीच्या वेळची माहिती पुढे देत आहे.

चैत्र ते वैशाख महिना या दिंडीची पायी परंपरा व माहिती :- चैत्र महिन्याच्या शुद्ध द्वादशीला दिंडी श्री मच्छिंद्रनाथ श्री गोरक्षनाथ येथील दिंडी नियम खालील प्रमाणे -

श्री गुरु केदारबाबा कराडकर यांच्यापासून हि दिंडी आजही चालत आहे. श्री क्षेत्र सुखाचारी शुकाचार्य येथे नाथाला जाताना पायी दिंडी जाते. तेथुन शुद्ध पंचमीला मच्छिंद्रगड येथे दिंडी जाते. गडावरुन नरसिंहपूर ते वाठार या गावी जाते. वाठार हे गाव श्री गुरु तुकाराम बुवा यांचे गाव आहे. हे गाव कोल्हापूर-कराड रोडवर आहे. तुकारामबुवा व श्री गुरु केदारबाबा हे समकालीन होते. श्री गुरु केदारबाबा ते पंढरपूरची पायी महिन्याची वारी करीत असताना चैत्र महिन्यामधे उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे त्यांचे पाय अतिशय भाजत होते. त्यावेळेस त्यांनी श्री विठ्ठलाचा धावा केला, ''भगवंता ! मी पंढरपूरापर्यंत कसा येवू पाय जास्त भाजु लागले आहेत'' असे कळवळून अंतःकरणापासून श्री विठ्ठलाचा धावा केला. ज्या माळरानावर साधे चिटपाखरू दिसत नाही अशा निर्जल ठिकाणी मनुष्य रुपात देवानी येवून कातडी जोडे श्री गुरु केदारबाबा यांना दिले. परंतु त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना अतिशय दुःख झाले आपले काम भगवंतास करावयास लागले म्हणुन त्यांनी कातडी जोडे पायात न घालता ते कातडी जोडे स्वतःच्या डोक्यावर घेवून श्री

गुरु केदारबाबा यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर, आळंदी, देहू, पैठण, त्रिंबकेश्वर, नाशिक, नेवासे, सासवड, गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथ या तिर्थक्षेत्राच्या पायी वाऱ्या केल्या.



आजही वाठार हे गांव श्री गुरु वै. तुकारामबुवा वाठारकर यांच्याकडे श्री गुरु केदारबाबांनी दिलेले कातडी जोडे आहेत. वाठार गांवातील ग्रामस्थ वारकरी सांप्रदायिक मंडळींनी भव्य मंदिर बांधलेले आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये कातडी जोडे पुजेसाठी ठेवलेले आहेत. महाराष्ट्रात असे कोठेही स्थान नाही जेथे कातडी जोड्याची पूजा होते. वाठार या गांवचे भाग्य थोर, आजच्या मित्तीला वै. भागवतबुवा कराडकर यांची पायी दिंडी चैत्र महिन्यात मुक्कामास असते. तेथील जेवण्याची सोय पाटील घराणा व ग्रामस्थ मंडळी करतात.

१) श्री. शंकर विष्णू पाटील } मु. पो. वाठार,
२) श्री. पांडुरंग विष्णू पाटील } ता. कराड
३) वै. कृष्णाजी धोंडीबा पाटील } जि. सातारा

पाटील घराणा आणि ग्रामस्थ मंडळी दिंडीचे आदराने स्वागत करतात. तेथील वारकरी, सांप्रदायिक मंडळी त्या मंदिरामध्ये

कीर्तन, भजन, हरिपाठ नित्य नियमाची सेवा तेथील ग्रामस्थ मंडळी सेवा म्हणून मनोभावे करतात. आज या वाठार या गांवचे भाग्य थोर आहे, कारण ज्या पंढरीरायांनी कातडी जोडे श्री गुरु केदारबाबा यांना दिले ते कातडी जोडे बाबांनी पायात न घालता स्वतःच्या डोक्यावर घेवून वाऱ्या केल्या. म्हणून वाठार या गांवचे व ग्रामस्थ व गावकरी यांचे भाग्य थोर आहे. श्री गुरु केदारबाबा आणि श्री गुरु तुकारामबुवा यांची गुरु सेवेची परंपरा वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर हे चालवत होते. म्हणून आजही त्या मंदिरामध्ये राहण्याचा मान वै. भागवतबुवा यांच्या दिंडीस आहे. वाठारकर ग्रामस्थ मंडळी आणि पाटील घराणा यांचे ऋणानुबंध कराडकर घराण्याची आहेत. सर्व ग्रामस्थांचे श्री. ह.भ.प. अरुण महाराज कराडकर यांच्यावतीने हार्दिक अभिनंदन करीत आहोत.

दुसरे दिवशी सकाळी दिंडी नेर्ले या गावी जाते. श्री क्षेत्र नेर्ले येथे दिंडीला पायघड्या घालून पंढरपूरची दिंडी म्हणून नेर्ले या गावात नेतात. दिंडी तेथे मुक्कामास राहते. श्री संत जंगली महाराज यांच्या मठामध्ये दिंडी मुक्कामास थांबते. तेथील जेवणाची सोय ग्रामस्थ मंडळी करतात. तेथून दिंडी बत्तीस शिराळा येथे वद्य दशमी दिवशी गोरक्षनाथ येथे मुक्कमास जाते. गोरक्षनाथावरील नियम - वद्य एकादशी दिवशी वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर आणि श्री. ह.भ.प. टेंबुकर मंडळी महाराज यांच्या सर्व दिंड्या एकत्र करुन अशी भव्य दिंडी गोरक्षनाथ येथे प्रदक्षणेस जाते. सर्व महाराज मंडळी कराडकर आणि टेंबुकर पूर्व परंपरेपासून गोरक्षनाथ येथे प्रदक्षणेस जातात. दिंडी दुपारी चार वाजता निघते. एकादशी दिवशी रात्री आपापल्या परंपरेनुसार आपापल्या जागी कीर्तन सेवा व जागर करतात. दुसरे दिवशी, म्हणजेच द्वादशी दिवशी दिंडी पंढरपूरकडे प्रस्थान करते. जाण्याचे व येण्याचे अंतर ४०० कि. मी. होते.

बत्तीस शिराळे ते ओझर्डे मार्गे दिंडी काळंबवाडी येथे श्री

काळंबदेवीच्या मंदिरात मुक्कामास असते. काळंबादेवीचे वैशिष्ठ म्हणजे ती साक्षात आदिशक्तीचे रुप आहे. या मंदिरात सांप्रदायिक पद्धतीने भजन, कीर्तन, हरिपाठ व नित्य नेमाची सेवा अजुनही चालते. पंढरपूरहून पायी दिंडी येताना या देवीच्या दर्शनास येते. तेथील देवाची प्रसाद म्हणून देवीला आलेले वस्त्र व नारळ प्रसाद येथील गुरव दिंडीच्या विणेकऱ्यास देतात व ग्रामस्थ मंडळी वारकरी सांप्रदायिक मंडळी काळंबावाडी ही दिंडी पंढरपूरकडे घालवण्याकरिता वेशीपर्यंत सर्व भजनी मंडळी येतात. परत येताना काळंबवाडी ते श्रीक्षेत्र नेर्ले या गावी श्रीसंत जनाआक्का मंदीर यांचे आहे. म्हणजे आजच्या युगात नवसास पावणारी आक्कांची समाधी आहे.

आक्कांचा उल्लेख करताना त्या पंढरपूरची महिन्याची वारी पायी करत असत. त्या पांडुरंगाच्या सेवेधारी वारकरी म्हणून मानत असत. त्यांची अंतःकरणापासून इच्छा होती, मी देह ठेवल्यावर वै. भागवतबुवा कराडकर यांच्या पोटास यावे. आक्कांची इच्छा त्याप्रमाणे त्या जन्मास आल्या म्हणून वै. भागवतबुवा कराडकर यांनी आपल्या मुलीचे नांव जनाबाई ठेवले. वै. भागवतबुवा कराडकर यांच्या पहिल्या पत्नी नेर्ले या गावच्या होत्या. त्या प्लेग या साथीच्या रोगामध्ये वारल्या. नंतर दुसरी पत्नी श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज येथील सेवेधारी वै. तुकारामबुवा मांडवे यांच्या बहिण होत्या. दुसरी पत्नी श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर येथे गंगाद्वारमध्ये बुडुन वारल्या. त्यांच्या तिसऱ्या पत्नी सावळज गावातील निंबाळकर घराण्यातील सुंदराबाई ह्या होत्या. सुंदराबाई यांच्याबरोबर विवाह झाल्यावर पंधरा वर्षानंतर जनाबाईचा जन्म झाला.

नेर्ले या गावातून दिंडी रामबेट येथे कृष्णा नदी येथे येते. तेथून बिचूत या गावात कृष्णेच्या पाणवठ्याला श्री. वै. ह.भ.प.

पिराजी पाटील यांची समाधी आहे. तेथून आरती करुन दिंडी बिचूत या गावी प्रवेश करते. वै. पिराजी पाटील हे निष्ठावंत, निष्काम बुद्धीचे सेवेधारी वारकरी होवून गेले म्हणून दिंडी तेथे आरती करते. गणेश खिंडीमधून दिंडी वांगी या गावी येते. वांगी हे गाव वै. भागवतबुवा कराडकर यांच्या घराण्याशी आजही श्रद्धेने राहते.

वांगी ते विटा ते वेजेगांव

वेजेगांवकरांचे व केदारबाबांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. त्या गावामध्ये केदारबाबांच्या नावावर सात दिवसांचा नाम सप्ताह आजही सुरु आहे. वै. गणेश कुलकर्णी हे करत असत. तेथील वैशिष्ट म्हणजे वै. गणेशकाका कुलकर्णी यांच्या शेतात चार ते पाच गुंठ्यामध्ये भव्य अशी मोठी पिपरन आहे. त्या पिपरनीखाली बसुन श्रीगुरु केदारबाबा भजन करत असत. वेजे गावातील काही लोकांनी त्या झाडाच्या फांद्या तोडण्याचा प्रयत्न केला. अशा लोकांचा वंश संपला. म्हणून आजही त्या वृक्षास तोडण्यास कोणीही धजपत नाही. तो वृक्ष म्हणजे श्रीगुरु केदारबाबा यांच्या नावानी ओळखला जातो.

वेजे गाव ते देवीखिंडी, घर निधी निंबुर्डे शेरेवाडी शिंगुर्णी, कोळेगांव, जैनवाडी, हुंपरीस येथे श्रीक्षेत्र पंढरपूर तालुक्यातील हुपरी हे गांव श्रीगुरु शेवतुबाबा पवार कराडकर यांची समाधी हुपरी या गांवी आहे. श्रीक्षेत्र गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथ पायी वारी चालू असताना श्रीगुरु शेवतुबाबा यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर या पंचक्रोशीमध्ये देह ठेवला. श्रीगुरु केदारबाबापासून ते तिसरे शिष्य होते. त्या हुपरी गावामध्ये वैशाखशुद्ध नवमी या दिवशी पुण्यतिथी साजरी करतात. त्यागावामध्ये वारकरी सांप्रदायिक घराण्यातील श्री. वै. हनुमंत तात्या नागणे यांचा मुलगा श्री. अशोक हनुमंत नागणे पाटील हे स्वतः नैवेद्य घेऊन ज्या ठिकाणी समाधी आहे तेथे दिंडी नेवून समाधीची पूजा व आरती करुन दिंडी त्यांच्या घरी परत येते व तेथील दिंडीतील

सर्व लोकांना जेवण दिले जाते. या पद्धतीने पुण्यतिथी साजरी केली जाते.

दशमी दिवशी दिंडी सकाळी पंढरपूरकडे मार्गस्थ होते. वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांच्या राहत्या घरी पंढरपूर येथे नेमाचे अभंग म्हणून आरती होते व दिंडीची सांगता होते.

पावलो पंढरी वैकुंठ भुवन । धन्य आजि दिन सोनियाचा ॥१॥
पावलो पंढरी आनंद गजरे । वाजतील तुरे शंख भेरी ॥२॥
पावलो पंढरी क्षेम आलिंगनी । संत या सज्जनी निवविलो ॥३॥
पावलो पंढरी पार नाही सुखा । भेटला हा सखा मायबाप ॥४॥
पावलो पंढरी येरझार खुंटली । माऊली वोळली प्रेमपान्हा ॥५॥
पावलो पंढरी आपुले माहेर । नाही संसार तुका म्हणे ॥६॥

✽ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ✽

पालखी सोहळ्यामध्ये रथापुढे दिंडी नं. १० वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर या नावाने दिंडी चालते. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) यांना श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आणण्याकरिता म्हणून ज्येष्ठ शुद्ध द्वादशी दिवशी दिंडीचे पंढरपूर येथून प्रस्थान होते. सप्तमी दिवशी श्रीक्षेत्र आळंदी येथे दिंडी येते. श्रीक्षेत्र पंढरपूरहून वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांची दिंडी आळंदीस स्वतंत्र जाते. तेथून अष्टमी दिवशी प्रस्थानाच्या वेळेस चार विणे एकत्र येतात. शुद्ध अष्टमी ते दशमी या मित्तीस पालखी सोहळ्यामध्ये एकत्र येवून चालतात. वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर, त्यांचे पुतणे श्री. ह.भ.प. पंढरीनाथ महाराज कराडकर, वै. ह.भ.प. एकनाथबुवा कराडकर आणि वै. ह.भ.प. गणपतबाबा कराडकर हे एकत्र दिंडीमध्ये चालतात. आतापर्यंत दिंडीमध्ये कोणत्याही प्रकारचे वाद अथवा मतभेद नव्हते; पण तरडगावच्या जागरविषयी काही समाजातील वारकरी मंडळींनी अपप्रचार करून आमच्या पूर्व

परंपरेच्या सेवेमध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जे स्वतःस हरिभक्त परायण समजून घेतात त्यांना परमार्थ सेवेची चाड नाही. अशा मंडळींनी १० नं. दिंडीमध्ये वाद कसा निर्माण होईल अशी या मंडळीची भावना आहे. यामुळे समाजामध्ये श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) पालखी सोहळ्यामध्ये आपले स्वतःचे अस्तित्व नसतांनासुद्धा आपण जे काय करतो याचे भान रहात नाही. माऊलींच्या घोषवाक्याप्रमाणे

दुरितांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो ॥

वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांची दिंडी म्हणजे समाजामध्ये वाद न निर्माण होता वारकरी सांप्रदायिक एकत्रपणे कसा चालावा म्हणून आजही चार विणे एका ठिकाणी चालतात. याची दखल समाजातील सर्व महाराज मंडळींनी आणि दिंडीवाले यांनी निश्चित घेण्यासारखी आहे.

वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांच्या जीवनातील प्रसंग व सत्य घटना :-

वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांची मुलगी जनाबाई कराडकर. वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांचा जन्म इ. स. १८९९ या सालातील. ते १९६१ रोजी वैकुंठवासी झाले. शके १८८३ अश्विन वद्य द्वितीया. माझे वडील वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांच्या तोंडून ऐकलेली माहिती मी आपणापुढे मांडत आहे. माझे वडील वयाच्या ७ ते ८ वर्षाचे असतांना त्यांचे वडील वारले. त्यानंतर ८ वर्षाचे असताना भावकीतील त्यांच्या चुलत्यांनी घेऊन बैलगाडीमध्ये बसवून श्रीक्षेत्र पंढरपूरहून जाताना त्यांना बैलगाडीसह तरसवाडीच्या घाटामधे सोडून त्यांचे चुलते निघून गेले. त्या वेळेस एस. टी., ट्रक ही वाहने नसत म्हणून पुर्वीचे लोक बैलगाडीने प्रवास करत असत. त्या दिवशी सायंकाळच्या वेळेपर्यंत माझे वडील रडत बसले असताना तेथे साक्षात भगवंताने मनुष्य रुपात येवून विचारले,

''का रडत बसला आहेस ?'' त्यावेळेस त्यांनी मनुष्यरुपी देवास सांगीतले, ''चुलते मला येथे सोडून गेले आहेत.'' त्यावेळेस वै. भागवतबुवांना भगवंताने विचारले, ''तुला आता कोठे जायचे आहे?'' तर त्यांनी सांगितले की मला वेजेगावचे गणेशकाका कुलकर्णी यांच्या घरी नेऊन सोडा. मग त्या मनुष्यरुपी देवाने गाडी जुंपली व ते दोघे मिळून वेजेगाव येथे आले. त्यानंतर माझे वडील गणेशकाकांच्या घरामध्ये हाक मारत गेले. काकांनी त्यांची विचारपूस केली व एकटा कसा काय आलास म्हणून विचारले. त्यानंतर त्यांनी काकांना सर्व माहिती सांगितली व ते रडायला लागले. माझे वडील व गणेशकाका दोघेही घराच्या बाहेर आल्यावर पाहतात तो बैलगाडीजवळ कोणीच नव्हते. मग वेजेगावातील सर्व मंडळीनी त्या देवमाणसाचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला पण ती व्यक्ती कोणासही सापडली नाही. ही घटना वेजेगावातील जुन्या लोकांच्या माहितीची आहे. पण ''श्री विठ्ठलाने, साक्षात पांडुरंगानेच मला आणुन सोडले'' अशी माझ्या वडिलांची भावना होती. कारण त्यांची पांडुरंगावर नितांत श्रद्धा होती. वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांची आई म्हणजेच आमची आजी श्रीमती राहीबाई यांनी भागवतबुवा यांना घेऊन सर्व तीर्थांच्या वाऱ्या सुरु केल्या. त्यानंतर लहानपणापासून त्यांचा सांभाळ श्री अंमळनेरकर महाराज आणि बेलापूरकर महाराज यांनी केला. या दोन पुण्यवंतांनीच श्री भागवतबुवांना पूर्व परंपरेची घराण्यातील सेवा सुरु ठेवण्यास भरपूर सहकार्य केले. असे लिखाण श्री अंमळनेरकर महाराज आणि श्री बेलापूरकर महाराज यांच्याकडे आहे.

श्रीक्षेत्र आळंदी, देहू, पैठण, नेवासे, नाशिक, त्रिंबकेश्वर, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ आणि पंढरपूर या ठिकाणी दिंडी गेल्यानंतर जे नेमाचे अभंग म्हणायचे असतात त्यांची हस्तलिखीत वही आजही माझ्याजवळ आहे. श्रीसंत तुकाराम महाराज यांचे पणतु, श्रीसंत

महादेव महाराज यांचे हस्तलिखीत श्रीसंत महादेव महाराज यांनी श्रीगुरु केदारबाबा यांना हा गाथा प्रसाद म्हणुन दिला. तसेच श्रीसंत नामदेवरायांचे अभंग, श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचे समाधीचे अभंग, बाळक्रीडा, हस्तलिखीत आजच्या मित्तीला ते माझ्याजवळ आहे. आजही पूजेला घरी ठेवले आहे. माझ्या वडिलांनी आयुष्यामध्ये निष्काम बुद्धिने परमार्थ केला म्हणुन माझ्या भाग्यात ही परंपरा चालवण्याचा योग मला आला .

माझ्या वडिलांची मिरासीगा देवा।
तुझी चरणसेवा पांडुरंगा॥

वयाच्या आठ ते नऊ वर्षापासुन ते पंढरपुरात राहु लागले. कै. वासुदेव गुरु तुकाराम पवार कराडकर यांनी इ. स. १८८६ रोजी पंढरपूर येथे जागा खरेदी घेतली. पूर्वीच्या नेमाप्रमाणे माझ्या आजोबांचे नांव वासुदेव लक्ष्मण पवार कराडकर यांच्या नावामध्ये 'तुकाराम गुरु' हे लिहिण्याची परंपरा होती. जो कोणी शिष्य असेल त्यास गुरुचे नाव लावल्याशिवाय त्यास शिष्य म्हणत नसत. परंपरा चालविण्याकरिता हे असे पूर्वीचे रिवाज होते.

माझ्या वडिलांनी, मी स्त्री असुनसुद्धा पुरुषाप्रमाणे लहानपणी मला खांद्यावर घेऊन दिंड्या चालविल्या. कधी कधी काही वारकरी देखिल घेत असत. आमच्या घराण्यात ज्यावेळेस मुल जन्माला येते त्यावेळेरा पाचवे दिवशी, मुलगा असो वा मुलगी, त्याच्या गळ्यात घरातील वयस्कर स्त्री किंवा पुरुष यांच्या हातून माळ घालण्याची प्रथा आहे. माळ घालण्याकरिता बाहेर जाण्याची गरज नसते.

❋ श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) पालखी सोहळा ❋

माझ्या वडिलांनी दिंडीवाल्यांसोबत राहून परंपरेची सेवा केली. आतापर्यंत कुठलीही स्वार्थाची अपेक्षा न बाळगता ही परंपरा जतन करीत आहोत. इ. स. १९३६ व १९४७ श्री संत ज्ञानेश्वर

महाराज (माऊली) पालखी सोहळा स्कीम निर्माण झाली. त्या वेळेस ते दस्तुर खुद्द स्वतः हजर होते. त्यांना श्री गुरु विषयी अभिमान होता. म्हणून तरडगाव येथील जागराला कराडकर आणि केदारबाबा नाव देण्यात आले.

श्रीगुरु केदारबाबा कराडकर, श्री गुरु हैबतबाबा अरपळकर (मालक) यांनी सर्व परंपरेने दिंडीवाल्यांचे पूर्वज एकत्र करुन हा पालखी सोहळा निर्माण केला. तसेच पौष महिन्यातील पायी वारी श्री गुरु हैबतबाबा अरपळकर (मालक) यांनी आळंदी ते त्रिंबकेश्वर आणि श्री गुरु केदारबाबा व श्री गुरु भानुदास महाराज बेलापूरकर यांनी पंढरपूर ते त्रिंबकेश्वर पायी वारी चालू केली. श्री गुरु निवृत्तीनाथ चरित्र यामध्ये पुस्तक लेखक पांडुरंग पाटील यांच्या पुस्तकामधील माहिती पान नं. २२८ मधील श्री गुरु केदारबाबा कराडकर यांचे प्रयाण इ. स. १९११ व ब प्रमाणे इ. स. १८९२ मध्ये केलेला उल्लेख हा पूर्ण चुकीचा आहे. जे कोणी ह.भ.प. ज्यांनी खरेतर चुकीची माहिती देवू नये, अशी मंडळी आमचे श्री गुरु यांच्या विषयीची खोटी माहिती देवून आपल्या नावाचा उदो-उदो करुन घेतात.

तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे । येरा गबाळ्याचे काम नाही ॥

वै. भागवतबुवा यांच्या जीवनातील अनेक प्रसंगी सांगण्याची मला इच्छा आहे. १९४२ साली पुणे येथे रुबी हॉस्पिटलमध्ये हार्नियाचे ऑपरेशन झाले त्यावेळचा प्रसंग :- पुणे भागातील व पंढरपूर भागातील सर्व दिंडीवाले महाराज लोक तेथे हजर होते. त्यावेळेस ऑपरेशन म्हटले की लोकांच्या मनात भिती निर्माण होत असे. वै. भागवतबुवा यांच्या आयुष्यामध्ये त्यांनी सेवेचे व्रत धारण केले होते.

१) मुळ मालक : वै. ह.भ.प. भागवतबुवा निवृत्ती कराडकर

२) पुतण्या : श्री. ह.भ.प. पंढरीनाथ कराडकर

३) वै. ह.भ.प. एकनाथ कराडकर
४) वै. ह.भ.प. गणपतबाबा कराडकर

संदर्भ :- तीन व चार नंबर हे वै. भागवतबुवा कराडकर यांच्या घराण्याशी काहीही संबंध नाही. भावकी अथवा पाहुणे नाहीत. अडनाव कराडकर व कऱ्हाड भागातील असल्यामुळे कराडकर असे पडले. पूर्वी वारकरी सांप्रदायामध्ये भजनी मंडळी दिंडीमध्ये चालण्यासाठी कमी असल्यामुळे पूर्वीच्या लोकांना भजन प्रिय होते. हा हेतु मनात ठेवून भजन चांगले व्हावे म्हणुन माझ्या वडिलांनी हे चार विणे एकत्र घेऊन दिंडी चालविली. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यामधे त्यांनी अनेक दिंडीवाल्यांचे वाद मिटविले. प्रत्येक दिंडीत ३० ते ४० वारकरी असत. एकदा पालखी सोहळ्यामध्ये काहीतरी घटना घडली होती.

१९४० ते १९४२ ची घटना :- आळंदीतील गुरव आणि श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी ज्यावेळेस गुरवाचा वाद संस्थानच्या विरोधात होता त्यावेळेस माझे वडिल वै. भागवतबुवा यांनी सर्व दिंडीवाल्यातर्फे पंढरपूरमध्ये खाजगीवाले बॅरिस्टर वकील यांच्यामार्फत संस्थानाची सत्य बाजू मांडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानला सहकार्य केले. त्यावेळेस झाजले हे संस्थान कमिटीमध्ये पंच म्हणून होते. त्यावेळेस माझे वय १० वर्षाचे होते. माझा जन्म १९३२ साली श्रीक्षेत्र पंढरपूर येथे झाला. श्री. भागवतबुवा हे १९६१ साली वैकुंठवासी झाले. त्यानंतर माझी आई श्रीमती सुंदराबाई भागवत कराडकर यांनी १९६१ ते १९८५ पर्यंत म्हणजे २४ वर्ष सर्व तीर्थक्षेत्रातील वाऱ्या स्वतः बैलगाडीने जावून परंपरा सुरु ठेवली. १९८६ साली त्यांच्या पायास गंभीर दुखापत झाल्यामुळे १९८६ ते १९९४ मी स्वतः माझ्या वडिलांची परंपरा चालविली. माझ्या वडिलांपासून १९५६ ते १९९८ या काळात वै. महादु पाटील एकसंबा (कर्नाटक) याने आमच्यातर्फे जावून सर्व

तीर्थातील नारळ प्रसाद त्याने घेतले.

वै. भागवतबुवा यांनी महादुबुवा वारकरी यास मुलाप्रमाणे सांभाळल्याने त्यांच्या सेवेचा उल्लेख करणे भाग पडले.

ज्या ज्या भक्ती जेथे जेथे । पाचारिले ज्या ज्या अर्थे
तुम्ही जावोनी तेथे । साह्य केले श्रीहरी ॥

माझा मुलगा श्री. ह.भ.प. अरुण महाराज कराडकर हे माझ्या वडिलांची सेवा व परंपरा चालवितात. श्री गुरु केदारबाबापासून दिंडी परंपरा आजही माझ्या घराण्यात वै. भागवतबुवा कराडकर या दिंड्या सुरु आहेत. काही वारकरी सांप्रदायिक मंडळींना माझे सांगणे आहे, नुसत्या श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यापुरते वै. भागवतबुवा दिंडी परंपरा नाही हे त्यांनी जाणुन घ्यावे. इतर पाच महिन्यांची पायी वारी एक एक महिन्याच्या कालावधीत असतात.

श्रीक्षेत्र आळंदीहून पंढरपूरला येत असताना वै. भागवतबुवा हे वाखरी येथे श्रीगुरु लक्ष्मण महाराज यांनी एक सुपारी त्यांच्या हातामध्ये दिली. त्यानंतर माझा जन्म झाला असे माझे वडील मला सांगत. माझ्या आईला १४ ते १५ वर्ष मूल बाळ नव्हते. त्यानंतर माझा जन्म झाला. वै. भागवतबुवा यांना मी स्त्री असुनसुद्धा मुलाप्रमाणे माझा सांभाळ केला.

वै. भागवतबुवा कराडकर यांची मुलगी
श्रीमती जनाबाई कराडकर

कार्तिक शुद्ध द्वादशीस पंढरपूर येथुन श्रीक्षेत्र आळंदी येथे दिंडी पायी चालत जाते. वद्य चतुर्दशीस दिंडी देहू येथे जाते. तेथून पंढरपूरला प्रस्थान होते. जावयास १५ दिवस व यावयास १५ दिवस लागतात. मार्गशीर्ष शुद्ध दशमीला दिंडी पंढरपूरला परत येते.

✱ श्रीसंत निवृत्तीनाथ यात्रा पौष महिना ✱

पौष महिन्यामध्ये श्रीक्षेत्र पंढरपूर येथून वै. भागवतबुवा

कराडकर यांच्या राहत्या घरातून दिंडी निघते. श्रीसंत निवृत्तीनाथ मंदिर पंढरपूर येथून श्री गुरु बेलापूरकर यांच्या समवेत तेथून दिंडी श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर, नाशिक येथे प्रस्थान होते. या दिंडीमध्ये श्रीगुरु केदारबाबा कराडकर यांचा विणा असतो. श्रीगुरु केदारबाबा आणि श्रीगुरु भानुदास महाराज बेलापूरकर या दोघांनी मिळून पौष वारीची पायी दिंडी नेण्याची प्रथा सुरु केली तसेच श्रीगुरु भानुदास महाराज बेलापूरकर यांची वंश परंपरा -

मुळ पुरुष :- १) श्रीनिवृत्तीबुवा हिरवे बेलापूरकर - पेशवे दरबारी सेवा २) श्री शाहुबुवा - आळंदी येथे समाधी ३) श्री रामबुवा - बेलापूर येथे समाधी ४) श्रीसंत भानुदास महाराज - श्रीसंत निवृत्तीनाथांची पालखी सुरु केली ५) श्रीसंत भागवत महाराज ६) श्री भारतबुवा ७) श्री कृष्णबुवा ८) श्री रामबुवा बेलापूरकर ९) श्री ह.भ.प. मोहनबुवा रामबुवा बेलापूरकर हे दिंडी चालवितात. श्री बेलापूरकर आणि श्री कराडकरांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे व आपुलकीच्या नात्याचे दोन्ही घराण्याचे संबंध आज मित्तीला सुरु आहेत. जोवर चंद्र सूर्य आहेत तोवर हे संबंध असेच राहणार. यामध्ये तीळमात्र शंका नाही. दोन्ही घराण्याच्या गुरु सेवेची परंपरा आजच्या मित्तीस चालु आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे (मालक) श्री गुरु हैबतीबाबा अरफळकर हे श्रीक्षेत्र आळंदीहून पौषवारीकरीता दिंडी घेऊन श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वरला येतात. श्री गुरु भानुदास महाराज बेलापूरकर आणि श्रीगुरु केदारबाबा कराडकर हे समकालीन होते. ज्येष्ठ वारीला श्री हैबतीबाबा व श्री केदारबाबा हे श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासोबत असत. श्रीगुरु भानुदास महाराज हे श्रीसंत निवृत्तीनाथ पालखी सोहळ्याबरोबर असत. या तिघा श्रीगुरुंनी मिळून पौष वारीची सुरुवात केली.

श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर येथे दिंडी गेल्यानंतर दशमी ते त्रयोदशी या

मित्तीस श्री हैबतीबाबा व श्री केदारबाबा हे त्यावेळेपासुन मंदीरामध्ये ओवऱ्या (ओसरी) मध्ये आजही दोन्ही दिंड्या एकत्र करुन राहतात. श्री अरपळकर यांची परंपरा श्री. ह.भ.प. बाळासाहेब निवृत्तीबुवा अरपळकर (मालक) हे स्वतः दिंडी घेऊन पायी चालत येतात. वै. भागवतबुवा निवृत्तीबुवा कराडकर यांचा विणा दशमी ते त्रयोदशी या मित्तीस कीर्तन सेवेसाठी पंढरपूरहून श्री पांडुरंगाचा विणा म्हणुन तो विणा कीर्तनासाठी सेवेला असतो. एकादशी दिवशी जागर जागराची सेवा आमच्यातील काही ह.भ.प. मंडळी कीर्तनकार यांची, दिंडीवाल्यांची सेवा व परंपरा बंद पाडण्याची इच्छा असल्यामुळे अशा अधर्मी लोकांना श्री सद्गुरु निवृत्तीनाथ सद्बुद्धी देवो अशीच आम्ही श्री विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना करत आहोत.

श्री संत निवृत्तीनाथ समाधी संस्थान अध्यक्ष यांनी या गोष्टीची दखल न घेतल्यामुळे वै. भागवतबुवा कराडकर यांचे नातू श्री. ह. भ. प. अरुण महाराज कराडकर यांनी विणा नियमाचाबंद केल्यामुळे वारीस जाण्याचे बंद केले. ज्यावेळेस विण्याची सेवा सुरु कराल त्यावेळेसच वारी सुरु करु. हा विणा म्हणजे श्रीगुरु केदारबाबा कराडकर यांचा विणा होय. वै. भागवतबुवा कराडकर आणि श्रीमती वै. राहीबाई यांच्या नावावर आजही नारळ प्रसाद श्री संत निवृत्तीनाथ संस्थान, त्रिंबकेश्वर देतात. विण्याची परंपरा आजच्या मित्तीलाही सुरु आहे. तेथील सेवा बंद केल्यामुळे ४०० ते ५०० कि. मी. पायी जाणारा विणा बंद नाही. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगाप्रमाणे,

पाहे पा ध्वजेचे चिरगुट । राया जतन करिता कष्ट ॥

श्री विठ्ठलाच्या चरणी दिंडीवाल्यांची सेवा बंद होऊ नये एवढेच मागणे आहे.

भागवत संप्रदायाचा प्रचार दिंडी माध्यमातून होत असे. आतापर्यंत दिंडीवाल्याविषयी कोणालाही आपुलकी वाटत नाही. भागवत सांप्रदाय हा दिंडी माध्यमातून टिकुन आहे. निष्काम सेवेमुळे

श्री गुरु बेलापूरकर आणि श्री गुरु केदारबाबा कराडकर म्हणजे वै. भागवतबुवा कराडकर यांचा विणा श्रीक्षेत्र नाशिक, त्रिंबकेश्वर, पैठण आणि नेवासा या तिर्थयात्रा श्री बेलापूरकर आणि कराडकर समवेत चालवितात !

ज्यावेळेस श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे बांधकाम सुधारण्याचे काम चालु होते त्यावेळेस मंदिराच्या परिसरात भरपूर समाध्या होत्या. त्याकाढून तेथे मंदिराची सुधारणा करीत असताना श्री गुरु केदारबाबा यांचीही समाधी काढण्याचे ठरविले होते पण माझे आजोबा वै. भागवतबुवा कराडकर यांनी वै. मामासाहेब दांडेकर यांना सांगितले. नंतर वै. मामासाहेब दांडेकर आणि वै. भागवतबुवा कराडकर हे नेवासे येथे गेले. वै. मामासाहेब दांडेकरांचे शिष्य वै. ह.भ.प. बन्सीबुवा महाराज यांना सांगितले की ही समाधी म्हणजे वै. भागवतबुवा कराडकर यांच्या श्रीगुरुंची समाधी आहे तरी तू तेथून ती समाधी काढू नकोस व त्यांनी ते ऐकले. अशी ही घटना वै. ह.भ.प. बन्सीबुवा नेवासकर यांनी प्रत्यक्ष श्री ह.भ.प. अरुण महाराज कराडकर यांना सांगितली म्हणून श्री गुरु केदारबाबा यांची समाधी आज आहे त्याच जागी राहिली आहे. ही घटना इ. स. १९७५ साली ऐकावयास मिळाली. वै. ह.भ.प. बन्सीबुवा, वै. रामबुवा बेलापूरकर आणि श्री अरुण महाराज कराडकर यांचे श्री गुरु केदारबाबा यांच्या समाधीसही छायाचित्र प्रसिद्ध करीत आहोत. वै. बन्सीबुवा, वै. भागवतबुवा व वै. मामासाहेब दांडेकर यांनी श्री गुरु केदारबाबा यांची समाधी आहे त्या मूळ जागेवरुन हालविलेली नाही. वै. ह.भ.प. बन्सीबुवा नेवासकर यांचा श्री. ह.भ.प. अरुण महाराज कराडकर यांनी 'तुमचे आमच्यावर ऋण आहेत' असा उल्लेख केला. श्री गुरु केदारबाबांच्या जीवनातील प्रसंग, आमच्या पूर्वजांनी जे ज्ञात केले ते प्रसंग तुम्हा सर्वांसमोर उल्लेखनिय करीत आहोत.

श्रीक्षेत्र नेवासे येथून काल्याचे कीर्तन झाल्यावर श्री बेलापूरकर

आणि श्री कराडकर वै. भागवतबुवांचा विणा आणि दिंडी फाल्गुन वद्य त्रयोदशीला रात्री श्रीक्षेत्र नेवासे येथून निघते.

श्री गुरु केदारबाबा यांची नित्य नेमाची सेवा वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांचे नातू श्री. ह.भ.प. अरुण महाराज कराडकर परंपरेनुसार चालवित आहेत.

ज्यांना कोणाला श्री गुरु केदारबाबा कराडकरांचे संत चरित्र उल्लेख केलेल्या लेखकास विनंती आहे वै. भागवतबुवा कराडकर हे श्री गुरु केदारबाबांची परंपरा आजच्या मित्तीस त्यांचे नातू श्री. ह.भ.प. अरुण महाराज कराडकर हे परंपरा वै. भागवतबुवा कराडकर यांची चालवितात.

❊ श्री क्षेत्र पैठण नेवासे येथे दिंडीचे कार्यक्रम ❊

फाल्गुन शुद्ध द्वादशी दिवशी दिंडी पैठण येथे जाते. वै. भागवत कराडकर यांना राहत्या घरामधून दिंडी श्रीसंत निवृत्तीनाथ मंदिर, पंढरपूर येथे जाऊन तेथून दिंडी प्रस्थान श्रीक्षेत्र पैठणला निघते. श्रीगुरु भानुदास महाराज बेलापूरकर आणि श्रीगुरु केदारबाबा कराडकर या दोन्ही महाराजांचे घनिष्ट संबंध होते. इ. स. १७०५ पासून या दोघांनी ही परंपरा चालू केली. जसे श्रीक्षेत्र नाशिक, त्रिंबकेश्वर येथे दिंडी जाते, तसे श्रीक्षेत्र पैठण, नेवासे येथे दिंडी जाते. रंगपंचमी दिवशी श्रीक्षेत्र पैठणमध्ये दिंडी हजर होते. वै. रामचंद्रबुवा बेलापूरकर कीर्तन, वै. भागवतबुवा कराडकरांचे जागर वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर एकनाथ षष्ठी दिवशी श्रीसंत एकनाथ महाराज मंदीरामध्ये ही नेमाची सेवा आजच्या मित्तीला ही सुरु आहे. त्यांची ही सेवा श्री.ह.भ.प. मोहनमहाराज बेलापूरकर कीर्तनाची सेवा व श्री. ह.भ.प. अरुण महाराज कराडकराचा जागर श्री. ह.भ.प. बेलापूरकराच्या दिंडीमध्ये वै. भागवतबुवा कराडकरांचा विणा असतो. शुद्ध अष्टमी दिवशी दिंडीचे श्रीक्षेत्र नेवासेकडे प्रस्थान होते.



✻ श्रीक्षेत्र नेवासे येथे दिंडी गेल्यावर ✻

मोहिनी राजाच्या मंदिरामध्ये अभंग होतो. त्यानंतर श्रीक्षेत्र नेवासे येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये श्रीगुरु केदारबाबा यांच्या समाधीसमोर श्री. ह.भ.प. रामचंद्र (दादा) महाराज बेलापूरकर यांचे कीर्तन होत असे. आता त्यांच्या जागी त्यांचा मुलगा श्री. ह.भ.प. मोहन महाराज बेलापूरकर हे करतात. जागर हे श्री. ह.भ.प. अरुण महाराज कराडकर हे करतात. दुसरे दिवशी द्वादशी दिवशी वरील प्रमाणेच कार्यक्रम होतो.

त्रयोदशी श्री केदारबाबा यांची पुण्यतिथी या दिवशी समाधीची वै. भागवतबुवा कराडकरांचे नातु श्री ह.भ.प. अरुण महाराज कराडकर हे समाधीची महापुजा अभिषेक करतात. त्यावेळेस सकाळचे कीर्तन श्री. ह.भ.प. मोहन महाराज बेलापूरकर करतात. पूजा व कीर्तन झाल्यावर समाधीस नैवद्य विशेष म्हणजे वांग्याची भाजी आणि भाकरी यांचा नैवेद्य दाखविला जातो. तो नैवेद्य श्री कराडकर करतात. श्री गुरु केदारबाबा यांची पुण्यतिथी म्हणजे फाल्गुन वद्य त्रयोदशी हा दिवस आहे. सायंकाळचे कीर्तन काल्याचे हे कीर्तन श्री. ह.भ.प. मोहन महाराज बेलापूरकर करतात. या वेळेस

नेवासे येथील ग्रामस्थ मंडळी ४०० ते ५०० मंडळी हजर असतात. हा काला म्हणजे श्रीगुरु केदारबाबांचा काला होत असतो.

॥ श्री विठ्ठल रुक्मिणी प्रसन्न ॥

श्रीगुरु केदारबाबा आणि शिष्य परंपरा चरित्र लिहिणारा वै. भागवतबुवा कराडकर यांचा नातु श्री अरुण महाराज कराडकर.

१) श्रीगुरु केदारबाबा साळुंखे किवळ हे ब्रह्मचर्य व्रत धारण केलेले सिद्ध पुरुष होते.

२) श्रीगुरु केदारबाबा आणि श्रीगुरु तुकाराम वाठारकर हे दोघेही समकालीन होते.

३) जर श्रीगुरु केदारबाबांची परंपरा वै. भागवतबुवा हे चालवत नसते तर वाठार या गावी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जेथे कातडी जोडे पुजेस ठेवले आहेत ते मंदीर, त्या मंदिरामध्ये शिष्य या नात्याने दिंडी थांबली नसती.

४) श्रीगुरु केदारबाबा यांचे नाव श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा १९४७ स्कीम तरडगाव येथील जागर वै. भागवतबुवा दिंडी नं. १० यांनी कराडकर आणि केदारबाबा हे नाव न देता स्वतःच्या नावाचा उल्लेख केला असता कारण श्रीगुरु केदारबाबा हे आमच्या घराण्याच्या गुरुस्थानी असल्यामुळे कराडकर आणि केदारबाबा हे नाव देण्यात आले.

५) श्रीसंत निवृत्तीनाथ येथील पौष वारीसाठी श्रीगुरु हैबतीबाबा अरपळकर श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा (मालक) पंढरपूरहून श्रीगुरु केदारबाबा कराडकर आणि भानुदास महाराज बेलापूरकर यांची दिंडीची परंपरा आजच्या मित्तीला,

१) ह.भ.प. बाळासाहेब अरपळकर (मालक)

२) ह.भ.प. मनुबुवा बेलापूरकर (मालक)

३) श्री. अरुण महाराज कराडकर (मालक)

वंश परंपरेने अ. क्र. नं. १) श्री हैबतबाबांची परंपरा लिणा आजच्या

मित्तीला नेमाने बाळा साहेब निवृत्तीबुवा पवार अरपळकर अ. क्र. नं. ३) मधील श्रीगुरु केदारबाबा यांची परंपरा शिष्य वै. भागवतबुवा कराडकर यांचा नातु श्री अरुण महाराज कराडकर हे चालवितात. जर हैबतबाबा आणि केदारबाबा यांचे समकालीन नसतील तर दोन्ही दिंड्या आजच्या मित्तीला एकत्र राहिल्या नसत्या श्रीसंत निवृत्तीनाथ मंदिरामध्ये आजही एकत्र राहतो.

७) वै. भागवतबुवा कराडकर यांचे नित्य नियम श्रीक्षेत्र नेवासे येथे श्रीगुरु केदारबाबा यांच्या समाधीसमोर पुण्यतिथीला एकादशी ते त्रयोदशी या मित्तीला श्री मोहनबुवा बेलापूरकर आणि श्री अरुण महाराज कराडकर हे चालवितात.

८) याबद्दल कोणास ह.भ.प. मंडळी आणि वारकरी मंडळी यांना काही जर शंका असेल जर त्यांनी श्री अरुण महाराज कराडकर यांच्या संपर्क साधावा.

पत्ता :- वै. ह.भ.प. भागवतबुवा कराडकर यांचा वाडा
घ. नं. ९१९, अरुण टॉकीज शेजारी,
श्रीक्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूर

१) श्रीगुरु केदारबाबा यांची समाधी श्रीक्षेत्र नेवासे येथे आहे.

२) श्रीगुरु तुकारामबुवा यांची समाधी वाठारमध्ये आहे. तेथे दिंडी निघताना आरती होते व पुढील मुक्कामाकरता नेर्ले या गावी जाते (चैत्र).

३) श्रीगुरु शेवतुबाबा यांची समाधी पंढरपूर तालुक्यातील हुपरी या गावी आहे.

४) वैकुंठवासी लक्ष्मणबुवा, वासुदेवबुवा, निवृत्तीबुवा यांच्या समाध्या मु. पो. शाळगाव या गावी आहेत.

५) वै. भागवतबुवा कराडकर यांचे प्रयाण भूवैकुंठ श्रीक्षेत्र पंढरपूर येथे झाले असल्यामुळे त्यांची समाधी नाही.

श्रीगुरु केदारबाबा ससे पाटील (साळुंखे)
श्रीक्षेत्र नेवासे येथील समाधी स्थान